# निशाणी क्र. ०६ वरील आदेश

**(बाबुराव .वि. अशोक व इतर)**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने सदर प्रकरणात जैसे थे चा आदेश मिळणे करिता दाखल केलेला आहे.

०२. वादीचा अर्ज वाचला, वादीतर्फे श्री. एस. यु. गाढे वकील साहेबांचे एकतर्फी म्हणणे ऐकले. वादीच्या वकिलांनी त्यांच्या अर्जात असे नमूद केले की, वादी हा सन १९५५ पासून कुळ व ताबेदार असून उपभोग घेत आहे. प्रतिवाीदींची नावे मालकी रकाण्यात नाममात्र आलेले आहेत. तसेच यापूर्वी वादीने नियमीत दावा क्र. ७६/१९९२ दाखल केला होता व तो वादीच्या हक्कात मंजूर देखील झालेला आहे. परंतू प्रतिवादी हे त्यांचे नाव मालकी हक्कात असल्याचा गैरफायदा घेवून वाद जमीन विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत व तशा स्वरूपाची त्यांनी अनेक लोकांना विक्री करण्याची बोलणी केलेली आहे. प्रतिवादी हे वादीच्या मालकीच्या वादजमीनीतुन वादीस बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा परीस्थीतीत वादीने प्रतिवादी हे सदरील दाव्यात हजर होईपर्यत जैसे थे / परीस्थीती जशीच्या तशी ठेवण्याबाबत आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीच्या अर्जाचा व परीस्थीतीचा विचार केला असता मी या मतापर्यत आले आहे की, जर सध्य परीस्थीतीत वाद शेतजमीन त्या परीस्थीतीत ठेवल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता नाही. परंतू असे न केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी हे दाव्यात हजर होईपर्यत प्रतिवादी यांनी मौजे जैनपूर कोठारा येथील गट क्र. ३५ वाद शेतजमीन ज्या परिस्थीतीत आहे त्याच परिस्थीतीत ठेवावी व वाद मिळकत ही कोणासही हस्तांतर करू नये.

०३. वादीने दिवाणी प्रक्रिया संहितांचे आदेश ३९ नियम २—अ ची पुर्तता करावी.

स्वाक्षरित/—
( एस. एस. बजाज )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.

दिनांकः ०९.०९.२०२०.

Shital Shriram Bajaj

Digitally signed by Shital Shriram Bajaj
Date: 2020.09.11 11:14:58 +0530